MHAH230000542016

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | :- | २८-०१-२०१६ |
| नोंदणी तारीख | :- | २८-०१-२०१६ |
| निकाल तारीख | :- | १०-०६-२०२६ |
| कालावधी | | १० वर्षे ०४ महिने १३ दिवस |

**श्रीगोंदा येथील सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, श्रीगोंदा यांचे न्यायालयात**
( पिठासीन अधिकारी : प्रविण वि. पाटील )

**नियमीत दिवाणी दावा क्रमांक ३२/२०१६**

**(निशाणी क्र.२७)**

१ बंडू भिवाजी आल्हाट,
वय – ५३ वर्षे, धंदा - शेती,

२ तात्याराम भिवाजी आल्हाट,
वय – ४६ वर्षे, धंदा - शेती,

३ शहाजी भिवाजी आल्हाट,
वय – ३२ वर्षे, धंदा - शेती,

४ पार्वतीबाई भिवाजी आल्हाट,
वय – ७४ वर्षे, धंदा - शेती,

वादी क्र. १ रा. वडाळी, ता.श्रीगोंदा,
जि. अहमदनगर.

वादी क्र. २ ते ४ रा. शिर्डी **... वादी**
(बिरोबा रोड, भिमनगर)
ता.राहता, जि. अहमदनगर.

**विरुध्द**

१ लाला लक्ष्मण आल्हाट,
वय – ५३ वर्षे, धंदा - शेती,

२ सरस्वती लाला आल्हाट,
वय – ५० वर्षे, धंदा - शेती,

३ प्रकाश लाला आल्हाट,
वय – २२ वर्षे, धंदा - शेती,

४ अमोल लाला आल्हाट, **....प्रतिवादी**
वय – २० वर्षे, धंदा - शेती,

५ संभाजी लहानू आल्हाट,
वय – ७३ वर्षे, धंदा - शेती,

६ राहुल काशीनाथ आल्हाट,
वय – २४ वर्षे, धंदा - शेती,

७ अनुराधा काशीनाथ आल्हाट,
वय – २३ वर्षे, धंदा - शेती,

८ अनुपमा काशिनाथ आल्हाट,
वय – ३२ वर्षे, धंदा - शेती,

९ नंदिनी काशिनाथ आल्हाट,
वय – ५४ वर्षे, धंदा - शेती,

१० बाळकृष्ण भिवाजी आल्हाट, **....प्रतिवादी**
वय – ५२ वर्षे, धंदा - मजुरी,

११ पांडुरंग भिवाजी आल्हाट,
वय – ४३ वर्षे, धंदा - शेती व नोकरी,

प्रतिवादी क्र. १ ते ५ रा. पारगाव सुद्रीक,
ता.श्रीगोंदा, जि. अहमदनगर.

प्रतिवादी क्र. ६ ते ९ रा. रामकृष्ण अपार्टमेंट,
फ्लॅट क्र. ७, जुना मंगळवार बाजार, निंबाळकर
गल्ली, अहमदनगर.

प्रतिवादी क्र.१० रा. शिर्डी, (बिरोबा रोड
भिमनगर), ता. राहता, जि. अहमदनगर.

प्रतिवादी क्र. ११ रा. येरवडा जेल पोलीस,
पोलीस लाईन, नागपुर चाळमागे, येरवडा,
पुणे.

---

**दावा :- निरंतर ताकीदीचे मनाई हुकूमासाठी**

---

वादीतर्फे विद्वान वकील श्री. एस. डी. बोरुडे,
प्रतिवादी क्र.१ ते ४ विरुध्द विना कैफियत आदेश,
प्रतिवादी क्र. ५ ते ११ विरुध्द एकतर्फा आदेश.

---

## न्या य नि र्ण य

**( दिनांक १० जुन २०२६ रोजी घोषीत )**

प्रस्तुत निरंतर मनाई हुकुमासाठी दाखल केलेला आहे.

**वादीच्या दाव्याची संक्षिप्त हकीकत पुढील प्रमाणे :**

[०२] प्रस्तुतच्या दाव्यातील वाद विषय मौजे पारगाव सुद्रीक, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर येथील शेतजमिन मिळकत गट क्र. २५० मधील क्षेत्र हे. १.९८ आर व पोट खराब ०.१९ आर या पैकी वादी व प्रतिवादी क्र. ६ ते ११ यांच्या वडीलोपार्जित सामाईक मालकी वहिवाटीची १/३ हिश्याची उत्तर बाजुची वाटणी हा आहे. वर नमुद वाद विषय सविस्तररित्या वादपत्राच्या परिच्छेद क्रमांक १ मध्ये नमुद करण्यात आलेले आहेत. यापुढे सदरील वाद विषयांना थोडक्यात "दावा मिळकत" असे संबोधण्यात येत आहे.

[०३] वादीचे असे कथन आहे की, दावा मिळकतीमध्ये वादी व प्रतिवादी क्र. ६ ते ११ यांची सामाईक मालकी वहिवाटीची १/३ हिश्याची उत्तर बाजुची वाटणी असून दावा मिळकत गटा मध्ये पुर्व पश्चिम ओढा गेलेला आहे. दावा मिळकतीच्या दक्षिण बाजुने ओढा असून ओढयाचे दक्षिण बाजुने प्रतिवादी क्र. ५ यांची १/३ हिश्याची वाटणी असून त्याचे दक्षिण बाजुने सहहिस्सेदार बाळु व दशरथ अल्हाट यांची १/३ हिश्याची वाटणी आहे. प्रतिवादी क्र. १ ते ५ यांचा दावा मिळकतीचे मालकी वहिवाटीशी कोणताही संबंध नाही. दावा मिळकत व मौजे वडाळी येथील गट क्र. २५६ या जमिनीमध्ये वाटप करून मिळणेसाठी प्रतिवादी क्र. १ लालासाहेबने रे.मु.नं. १६८/२००९ हा दावा या न्यायालयात दाखल केला होता. सदर दावा सिध्द न झाल्याने नामंजुर झाला व त्या निकालाविरुध्द प्रतिवादी क्र. १ ने अपिल केलेले नाही. वादीचे कुटूंब हे वेगवेगळ्या ठिकाणी राहते, याचा गैरफायदा घेऊन प्रतिवादी क्र. १ ते ५ हे दावा मिळकतीमध्ये वारंवार वादीचे शांततामय कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करत आहेत. दिनांक

२९–०७–२०१५ रोजी प्रतिवादी क्र. १ व २ यांनी दावा मिळकतीमध्ये बेकायदा प्रवेश करून जे. सी. बी. यंत्राने लिंब, चंदन व बाभळीची झाडे काढून नुकसान केले. त्यानंतर दिनांक २८–१२–२०१५ रोजी प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी दावा मिळकतीमधील वादीचे ज्वारी पिक काढून वादी क्र. १ यास हरकत अडथळा करून शिवीगाळ व मारहाण केली. वादीने प्रतिवादी क्र. १ ते ५ यांच्याविरुध्द पोलीस ठाण्यात तक्रार दिली परंतु, पोलीसांनी तक्रारीची कोणतीही दखल घेतली नाही. त्यामुळे वादीने निरंतर मनाई हुकूमासाठी प्रस्तुत दावा दाखल केलेला आहे.

[०४] प्रतिवादी क्र. १ ते ४ हे न्यायालयात हजर झाले. परंतु, त्यांनी लेखी कैफियत न दिल्याने त्यांच्याविरुध्द प्रस्तुत दावा विना कैफियत चालविण्यात आला. प्रतिवादी क्र. ५ ते ११ यांना दाव्याचे समन्स प्राप्त होऊन देखील ते हजर न राहिल्याने त्यांच्याविरुध्द प्रस्तुत दावा एकतर्फा चालविण्यात आला.

[०५] वादींच्या वतीने दाव्या समर्थनार्थ साक्षीदार क्र.१ म्हणुन स्वतःचा (निशाणी क्र.२४) वर पुरावा नोंदविला. तसेच त्यांनी कागदोपत्री पुरावा म्हणजेच गट क्र. २५० चा सातबारा उतारा (निशाणी क्र.९), गट क्र. २५० चा गट नकाशा (निशाणी क्र.१०) इत्यादींवर विश्वास ठेवला. निशाणी क्र.२६ वरील पुरसिस सादर करत, त्यांनी त्यांचा पुरावा संपल्याचे न्यायालयास कळविले.

[०६] वादीतर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. वादीचे कथन आणि त्याअनुषंगाने दाखल केलेली कागदपत्रे यावरुन खालील मुद्दे माझे विचाराधीन येतात. सदर मुद्दे व त्यावरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंद करतो.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१. | दावा मिळकतीवर वादींचा कायदेशीर ताबा असल्याचे वादींनी सिध्द केले आहे काय ? | नकारार्थी. |

| | | |
|---|---|---|
| ०२. | प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी दावा मिळकतीमधील वादींच्या शांततामय कब्जे वहीवाटीस हरकत अडथळा केल्याचे वादीने सिध्द केले आहे काय ? | नकारार्थी. |
| ०३. | दाव्यात मागणी केल्याप्रमाणे निरंतर मनाई हुकूमाची दाद मिळणेस वादी पात्र ठरतो काय ? | नकारार्थी. |
| ०४. | काय आदेश आणि हुकूमनामा ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## का र ण मि मां सा

### मुद्दा क्र.०१ साठी :-

[०७] वादीने त्यांच्या कथनाच्या पुष्टयार्थ स्वतःचा पुरावा निशाणी २४ येथे नोंदवून दाव्यातील कथनांची पुनरावृत्ती केल्याचे दिसुन येते. सदर वादीच्या पुराव्याचे अवलोकन केले असता त्याने त्याच्या पुराव्यात दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी क्र. ६ ते ११ यांची सामाईक मालकी वहिवाटीची १/३ हिश्याची उत्तर बाजुची वाटणी असून दावा मिळकत गटा मध्ये पुर्व पश्चिम ओढा गेलेला आहे. दावा मिळकतीच्या दक्षिण बाजुने ओढा असून ओढयाचे दक्षिण बाजुने प्रतिवादी क्र. ५ यांची १/३ हिश्याची वाटणी असून त्याचे दक्षिण बाजुने सहहिस्सेदार बाळु व दशरथ अल्हाट यांची १/३ हिश्याची वाटणी आहे. वादीने दावा मिळकतीचा सातबारा उतारा निशाणी ९ येथे दाखल केलेला आहे. वादीने दाखल केलेला तोंडी व लेखी पुरावा विना आव्हानीत असल्यामुळे वादीचे कथन व अभिलेखावरील कागदोपत्री पुराव्याचे काळजीपुर्वक अवलोकन करणे आवश्यक ठरते.

[०८] विर्निदिष्ट अनुतोष अधिनियम १९६३ चे कलम ३८ अन्वये वादीचा मालमत्तेवरील हक्कावर किंवा मालमत्तेचा उपभोग घेणेवर किंवा प्रतिवादी अतिक्रमण करण्याची धमकी देतील, अशा प्रकरणांमध्ये न्यायालयास निरंतर मनाई हुकूमाचा आदेश पारीत करण्यात येतो. प्रस्तुत प्रकरणामध्ये वादींच्या कथनानुसार प्रतिवादी क्र.१ ते ५ हे हददीचा वाद उपस्थित करून वादींच्या दावा मिळकतीमध्ये शांततामय कब्जे वहिवाटीस

हरकत अडथळा करतात. या सर्व बाबींचा तसेच अभिलेखावर आलेला पुरावा यांचा विचार करता त्याचप्रमाणे संभाव्यतेचे प्राबल्य या स्थित तत्वाचा विचार करता वादीने दावा मिळकतीवर त्याचा असणारा ताबा सिध्द केला आहे किंवा कसे हे पाहणे आवश्यक ठरते.

[०९] वादीने निशाणी क्र.९ येथे दाखल केलेला दावा मिळकतीचा सातबारा उता-याचे अवलोकन केले असता दावा मिळकत गट क्र. २५० मध्ये वादी व प्रतिवादी क्र. ६ ते ११ यांच्यासोबत प्रतिवादी क्र. ५ संभाजी लहानू आल्हाट, बाळु परशुराम आल्हाट व दशरथ दगडू आल्हाट यांची नावे भोगवटादार सदरी मालकी हक्काने नमुद असल्याचे दिसुन येते. अशा परिस्थीतीत वादी कथन करतात त्याप्रमाणे वादग्रस्त क्षेत्र सदर गट क्रमांकामध्ये नेमके कोणत्या बाजूला व कोठे स्थित आहे हे स्पष्ट होत नाही. हे खरे की, वादीने वादग्रस्त मिळकतीची ओळख पटविण्याइतपत पुरेसे वर्णन, स्थान व व्याप्ती दर्शविणारे अचूक रेखाचित्र दाव्यासोबत जोडणे क्रमप्राप्त होते. परंतु वादीने वादग्रस्त मिळकतीचे अचुक वर्णन व व्याप्ती दर्शवणारे रेखाचित्र दाव्यासोबत दिलेले नाही. याबाबत दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश-७ नियम-३ मधील तरतूद विचारात घेणे गरजचे आहे. सदर तरतूदीनुसार वादीने दाव्यामध्ये दावा मिळकतीची व्याप्ती व स्थान दर्शविण्याकरीता वादपत्राच्या सोबत अचूक रेखाचित्र जोडणे आवश्यक होते. परंतू वादीने सदर कायदेशीर बाबींची पुर्तता केल्याचे दिसून येत नाही. एकंदरीत विवेचनाअंती दावा मिळकत म्हणजेच गट क्र. २५० मधील १/३ हिश्याच्या वादग्रस्त क्षेत्रामध्ये वादी व प्रतिवादी क्र. ६ ते ११ यांची शांततामय कब्जेवहीवाट असल्याचे सिध्द करण्यास वादीला अपयश आल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे विचारार्थ असलेल्या मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष नकारार्थी स्वरुपात नोंदविण्यात येत आहे.

**<u>मुद्दा क्र.०२ साठी :–</u>**

[१०] प्रस्तुत दाव्यात वादीने दावा मिळकत म्हणजेच गट क्र. २५० या संपुर्ण

गटाच्या चतुःसिमा नमुद केलेल्या आहेत. परंतु, गट क्र. २५० मधील वादी व प्रतिवादी क्र. ६ ते ११ यांच्या सामाईक मालकी वहिवाटीची १/३ हिश्याच्या क्षेत्राची चतुर्सिमा नमूद केलेली नाही. तसेच, वादीने गट क्र. २५० या पुर्ण गटाच्या चतुःसिमा दर्शविणारा गट नकाशा निशाणी १० येथे सादर केलेला आहे. परंतु, गट क्र. २५० मधील वादी, प्रतिवादी व इतर सह हिस्सेदार यांच्या अंतर्गत हिश्याच्या हददी खुणा दर्शविणारा सरकारी नकाशा अभिलेखावर दाखल केलेला नाही. अशा परिस्थीतीत गट नं. २५० मध्ये वादी व प्रतिवादी क्र. ६ ते ११ यांच्या नावे नोंद असलेले क्षेत्र गट क्र. २५० मध्ये नेमक्या कोणत्या बाजुला आहे हे स्पष्ट होत नाही. तसेच गट नं. २५० मध्ये वादी व प्रतिवादी क्र. ६ ते ११, प्रतिवादी क्र. ५ संभाजी लहानु आल्हाट, बाळु परशराम आल्हाट व दशरथ दगडू आल्हाट हे सहहिस्सेदार असल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट होते. याठिकाणी वादींची असे सिध्द करण्याची जबाबदारी होती की, दावा मिळकत म्हणजे गट नं.२५० मध्ये सर्व हिस्सेदारांच्या पूर्वीच सरसनिरस मानाने वाटप होउन त्यांचे क्षेत्र चतुर्सिमेसहीत निश्चित झालेले आहे. परंतू, प्रस्तुत दाव्यात वादीने अशा स्वरुपाचा पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. अर्थातच, वादी, प्रतिवादी क्र. ५ व इतर सहहिस्सेदार हे गट नं. २५० मधील सहहिस्सेदार असल्याचे प्रथमदर्शनी दिसत असून त्यांच्या परस्पर हिस्यांची चतुःसिमेअंतर्गत मोजणी होउन त्यांच्या क्षेत्रांच्या हद्दी निश्चित झाल्याबाबतचा पुरावा अभिलेखावर दाखल नाही. अशा परिस्थीतीत एक सहिस्सेदार दुस-या सहिस्सेदाराविरुध्द निरंतर मनाई सारखा हुकुम मिळविण्यास हक्कदार ठरत नाही. याबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडील **प्रकाश अकोटकर व इतर वि. मनुसरखाँ गुलाबखाँ व इतर एआयआर १९९६ बॉम्बे ३६** या न्यायनिर्णयामध्ये असे विषद केले आहे की,

> "Having found the character of possession as co-owner, as indicated above, the only question that arises for determination is, whether a co-owner, in possession is entitled to an injunction of this nature against the other co-owners. Once it is found that the possession of co-owner is for the on

behalf of other co-owner is for and on behalf of other co-owner, the other co-owner cannot claim injunction of this nature so as to exclude the other co-owners from exercising there right as co-owners"

[११] उपरोक्त विवेचनाअंती वादीची वादग्रस्त मिळकतीवर कब्जेवहीवाट आहे ही बाब संभवनियतेच्या प्राबल्यामध्ये सिध्द होत नाही. अर्थातच केवळ दावा मिळकतीच्या महसूल अभिलेखातील नोंदीवरुन वादीचा दावा मिळकतीमध्ये ताबा असल्याचे सिध्द होत नाही. कायदयाच्या प्रचलीत तत्वानुसार महसूल अभिलेखातील नोंदीचे जोपर्यंत विरुध्द बाजूने खंडण होत नाही तोपर्यंत सदर नोंदी कब्जा संबंधी वस्तूस्थिती दर्शवितात. अर्थातच, दावा मिळकतीच्या महसूल अभिलेखमध्ये प्रतिवादी यांच्या नावाची नोंद सहहिस्सेदार म्हणून असल्याचे सात बारा उता–यावरुन दिसून येते. पर्यायाने वादीची दावा मिळकतीमध्ये स्वतंत्र कब्जेवहीवाट असल्याचे वादीने सिध्द न केल्यामुळे प्रतिवादींनी वादीच्या दावा मिळकतीमधील ताब्यास हरकत अडथळा करण्याचा देखील प्रश्न उद्भवत नाही. सबब मुद्दा क्र. २ चे उत्तर नकारार्थी नोंदवतो.

**<u>मुद्दा क्र. ३ व ४ साठी :–</u>**

[१२] मुद्दा क्र.१ व २ च्या निष्कर्षावरुन वादी हे दावा मिळकतीवरील त्यांचा ताबा सिध्द करण्यात अयशस्वी ठरल्याचे स्पष्ट झालेले आहे. अशा परिस्थितीत दावा मिळकतीवरील कब्जास हरकत व अडथळा निर्माण न करण्याचा किंवा वादीनीं मागणी केल्याप्रमाणे निरंतर मनाई हुकूमाचा आदेश वादीच्या हक्कात मिळणेस वादी पात्र ठरत नाहीत. अर्थातच वादीचा दावा नामंजूर होण्यास पात्र आहे. परंतु प्रस्तुत दाव्याचे स्वरुप पाहता उभय पक्षकारांनी आपआपला खर्च सोसणे हे येथे संयुक्तीक व न्यायोचित होणार आहे. सबब, मुद्दा क्र.३ चा निष्कर्ष नकारार्थी स्वरुपात नोंदविण्यात येत असुन, मुद्दा क्र.४ चा निष्कर्ष देणेकरीता मी खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

[१] दावा नामंजुर करण्यात येतो.

[२] उभय पक्षकारांनी आपआपला खर्च सोसावयाचा आहे.

[३] येणेप्रमाणे हुकूमनामा तयार करण्यात यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

PATIL PRAVIN VISHWAS

Digitally signed by PATIL PRAVIN VISHWAS
Date: 2026.06.10 17:32:12 +0530

(प्रविण वि. पाटील)
सह दिवाणी न्यायाधीश,
कनिष्ठ स्तर, श्रीगोंदा.

दिनांक :– १०–०६–२०२६.

**-: <u>प्र मा ण प त्र</u> :-**

प्रमाणीत करण्यात येते की, या पी. डी. एफ. फाईलमधील प्रत्येक शब्द हा मुळ आदेशाच्या प्रतीप्रमाणे बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | : | एन.डी.दावत (श्रेणी-३) |
| न्यायालयाचे नांव | : | सह दिवाणी न्यायाधीश तथा<br>प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, श्रीगोंदा,<br>ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर. |
| न्यायनिर्णय घोषित केल्याचा दिनांक | : | १०–०६–२०२६ |
| पिठासीन अधिकारी यांनी सही केल्याचा दिनांक | : | १०–०६–२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड दिनांक | : | १०–०६–२०२६ |